| MHPU240000842015 | <u>रे. मु. नं. १४/२०१५</u><br>**ज्ञानेश्वर लायगुडे**<br>विरुद्ध<br>**बाळा रणपिसे व इतर** |
|---|---|

## <u>निशाणी क्र.२७ व २९ वरील संयुक्तिक आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचे अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे हे मयत झाल्याने त्यांचे विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यास जो विलंब झाला तो माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेले आहेत.

**०२.** वादीच्या अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे हे दि.३०/०९/२०२२ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी मयत झाल्यानंतर त्यांचा मृत्यू दाखला प्राप्त करुन घेण्यास व त्यांचे वारसांची माहिती घेण्यास बराच कालावधी गेल्याने सदरचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ झाला नाही तर वादी यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, मयत प्रतिवादी क्र.१ चे विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन अर्ज मंजुर करावे अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र.१ चे वारसांना संधी असतांनाही त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही म्हणून प्रस्तुतचे अर्ज त्यांचे म्हणण्याविना चालविण्यात आले.

**०४.** युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, वादींनी प्रस्तुत दावा हा साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. परंतु, दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे हे दि.३०/०९/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. परंतु, वादीने प्रस्तुत अर्ज हे दि.०२/०५/२०२३ रोजी दाखल केल्याचे दिसतात. अशा परिस्थितीत, वादीचे प्रस्तुतचे दिलेले अर्ज व त्याबाबत कायदेशीर बाब पाहता, दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २२ नियम ०४ प्रमाणे मयत प्रतिवादीचे वारस सदर व्यक्ती मयत झाल्यापासून

९० दिवसांचे आत अर्ज सादर करुन अभिलेखावर घेणे आवश्यक असते. वादीने सदरचे अर्ज दि.०२/०५/२०२३ रोजी दाखल केलेले दिसतात. वादीने प्रस्तुतचे अर्ज ०६ महिन्यांपेक्षा जास्त विलंबाने दाखल केलेले दिसतात. परंतु, असे जरी असले तरी, वादी यांनी त्यांचे अर्जातील कथनाचे सत्यतेसाठी वादी यांचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.२८ व ३० व मयत प्रतिवादीचे मृत्यू प्रमाणपत्र कागदयादी नि.क्र.२५ सोबत अभिलेखावर दाखल केलेले आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत, सदर अर्जात नमुद केलेली परिस्थिती व कायदेशीर बाब या सर्व बाबी सारासार न्यायबुद्धीने विचारात घेता सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्याय हक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही. उलटपक्षी, उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. शिवाय, प्रतिवादी क्र.१ चे वारसांनी देखील प्रस्तुत अर्जास म्हणणे देउन हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. सबब, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन, वादीचे अर्ज मंजुर करणे आवश्यक असलेच्या निष्कर्षाप्रत येवुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचे प्रस्तुत अर्ज नि.क्र.२७ व २९ मंजुर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे हे मयत झाल्याने झालेला अबेटमेंटचा आदेश शासनास रक्कम रु.५००/— (रक्कम रुपये पाचशे मात्र) खर्च जमा करण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो व त्यांचे कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

स्वाक्षरी/—
**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
घोडेगांव, जि. पुणे.

स्थळ : घोडेगांव
दि.२९/०४/२०२४

| MHPU240000842015 | **<u>रे. मु. नं. १४/२०१५</u>**<br>**ज्ञानेश्वर लायगुडे**<br>विरुद्ध<br>**बाळा रणपिसे व इतर** |
|---|---|

**<u>निशाणी क्र.३१ वरील आदेश</u>**

**०१.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे हे मयत झाल्याने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ प्रमाणे त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथानानुसार, प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे हे दि.३०/०९/२०२२ रोजी मयत झाल्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे व आवश्यक आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या हक्क, अधिकारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच, अर्ज मंजुर केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, वारस रेकॉर्डवर घेण्याचा व तशी दुरुस्ती करण्याचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र.१ चे वारसांना संधी असतांनाही त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही म्हणून प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणण्याविना चालविण्यात आला.

**०४.** युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुत दावा हा साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. परंतु, दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे हे दि.३०/०९/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादीने सदरचा अर्ज दि.०२/०५/२०२३ रोजी दाखल केलेला दिसतो. वादीने प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला दिसतो. परंतु, दाव्याचा गुणदोषांवर निर्णय होण्याकरीता सदर अर्जाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेउन त्याबाबतची दुरुस्ती महत्वाची दिसून येते. त्यामुळे, वादीने त्यांचे अर्जातील सत्यतेकरीता नि.क्र.३२ वर वादी यांचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. सबब, अशा परिस्थितीत त्यांच्या कायदेशीर

वारसांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ४ प्रमाणे दावा चालविण्याचा अधिकार टिकून रहात असल्याने प्रतिवादी क्र.१ बाळा भिमा रणपिसे यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना दाव्यात सामील करुन त्याप्रमाणे दुरुस्ती दावे अर्जात करणे गरजेचे आहे. शिवाय, प्रतिवादी क्र.१ तर्फे वारसांनी देखील प्रस्तुत अर्जास हरकत घेतली नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्यायहक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही अथवा दाव्याचे मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, प्रस्तुत दाव्यात सर्व पक्षकारांना सामील करुन घेतल्यास उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. वादीचा सदरचा अर्ज नि.क्र.३१ हा नि.क्र.२७ व २९ वर झालेल्या खर्चाचे अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीस असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर अर्जाप्रमाणे १४ दिवसांचे आत अथवा पुढील तारखेपर्यंत दावे अर्जात/सरनाम्यात दुरुस्ती करावी.

स्वाक्षरी/—

**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
घोडेगांव, जि. पुणे.

स्थळ : घोडेगांव
दि.२९/०४/२०२४